N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0413 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/04/2024 03:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 25/04/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/04/2024
**Time From (वेळेपासून):** 16:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/04/2024 **Time (वेळ):** 03:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 009
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/04/2024 03:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** अन्न व औषध प्रशासन,कोल्हापूर,विश्व रेसिडेन्सी,फ्लट नं202, ताराबाई पार्क,कोल्हापूर चे ,पार्कींगमध्ये
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्धीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राहुल शंकरराव सावंत

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उचगांव ,ता करवीर ,जि कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उचगांव ,ता करवीर ,जि कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9158877447

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किर्ती धनाजी देशमुख | | | 1. विश्व रेसिडेन्सी,फ्लट नं202, ताराबाई पार्क,,कोल्हापूर, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पहिला हसा रक्कम रुपये 25,000/ | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक - 27/04/2024
मी.राहुल शंकरराव सावंत, वय-38,व्यवसाय-हॉटेल उदयोग,रा.उचगांव,ता.करवीर,जि.कोल्हापूर मो.नं. 9158877447 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की,

मी वरील पत्यावर राहणेस असुन माझे किणी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथे मे.सम्राट फुडस नावाचे रेस्टॉरंट आहे. दि.15/03/2024 रोजी श्रीमती किर्ती देशमुख, अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर या माझे सदर रेस्टॉरंटवर आल्या व त्यांनी रेस्टॉरंटमधील अन्नपर्दाथांचे सॅम्पल घेतले व त्या अन्नपदार्थामध्ये दोष आहे असे सांगीतले. सदरवेळी मी कामानिमीत्त मुंबई येथे होतो. रेस्टॉरंटमध्ये माझे मेहुणे श्री.साहेबराव बाबुराव कांबळे हे होते त्यांनी सदरबाबत मला फोनवरून कळविलेने मी श्रीमती देशमुख यांचेशी फोनवर बोललो असता त्यांनी माझेकडे 10,000 /-रू. ची मागणी केली त्यावेळी नाईलाजास्तव माझे मेहुणे साहेबराव कांबळे यांनी त्यांना 10,000/-रू. दिले. त्यानंतर दि.22/03/2024 रोजी मला अन्न व औषध प्रशासन कोल्हापूर कार्यालयाकडून सॅम्पल घेतले असलेबाबतची नोटीस प्राप्त झाली. त्यानंतर मी देशमुख मॅडमना त्यांचे कोल्हापूर येथील कार्यालयात भेटायला गेल्यानंतर देशमुख मॅडमनी हे सर्व सुरळीत करून हवं असेल तर 1,00,000/-रू.दयावे लागतील असे सांगितले व मला दुसरे सॅम्पल देण्यास सांगून सॅम्पल तपासणीकरीता शासकीय नियमानुसार भरावी लागणारी रक्कम 5,750/- रू.इतक्या रक्कमेचा डी.डी काढून देण्यास मला सांगितले. माझेकडे श्रीमती किर्ती देषमुख मागत असलेले 1,00,000/- रुपये हे लाच म्हणुन मागत असल्याची माझी खात्री झाली. त्यांना त्यांचे मागणी प्रमाणे 1,00,000 /- रुपये लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दि.25/04/2024 रोजी त्यांचे विरुध्द श्री.सरदार नाळे,पोलीस उपअधीक्षक,अँन्टी करप्षन ब्युरो कोल्हापूर यांचेकडे तक्रारी अर्ज दिला आणि मी आज रोजी त्यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले त्यावेळी नाळे साहेबांनी दोन पंच उपलब्ध करुन त्याचा स्टाफ तयार ठेवला.

त्यानंतर नाळे साहेबांना माझा तक्रारी अर्ज दिला त्यावेळी साहेबांनी माझी दोन्ही पंच आणि स्टाफ यांचे सोबत ओळख करुन देवून त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगितले. नाळे साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हाला दिली. त्यानंतर मला श्रीमती देषमुख यांना भेटण्यासाठी पंच क्र.01 सोबत रवाना केले असता मी अन्न व औशध प्रषासन कार्यालय सुभाश रोड, कोल्हापूर येथे पोहचुन मॅडम यांना कॉल करुन कार्यालयाच्या आवारात आल्याचे सांगितले असता मॅडमंनी येत असल्याचे सांगून मॅडम थोडया वेळाने तेथे आल्या त्यावेळी आमच्यात कामाच्या अनुशंगाने चर्चा झाली असता मॅडम यांनी त्यांच्या मोबाईलमध्ये 1 असा आकडा टाईप करून मला दाखविला त्यावर मी त्यांना मॅडम 1 म्हणजे एक लाख काय...असे विचारले असता त्यांनी ते आता तुम्ही समजून घ्या... असे सांगितले त्यावर मी त्यांना एक लाख... दहा लाख... असे बोलेलो त्यावर परत मॅडम ते तुम्हाला समजायचे आहे...असे मला बोलल्या त्यावर मी त्यांना आता तुम्ही 1 टाकलाय त्या मोबाईलवर मी आता 1 वर काय समजायचे असे बोललो असता वर मी काय सांगू ... असे त्या बोलल्या त्यानंतर मी त्यांना एक लाख जरा जास्त होतय असे बोललो त्यावर मॅडम बोलल्या मग किती त्यावर कमी करा... तुमच्या हेच्यावर... असे मला बोलल्या.

त्यांनतर मॅडमनी त्यांच्या मोबाईलमध्ये सत्तर आकडा टाईप करून दाखविला त्यावर मी किती सत्तर हजार... असे बोलेलो त्यावर त्यांनी हं... असे बोलून होकार दिला. त्यावर मी त्यांना सत्तर हजार लय होत्यात मॅडम... तुम्ही मोबाईलला टाईपिंग करताय मला भिती वाटतीया... सत्तर हजार लय होत्यात पन्नास करा की... पहिले दहा दिल्यात असे बोललो असता मॅडम यांनी त्यांना दयाय लागतय असे बोलल्या... त्यांनतर मी हे त्यांना हे करून घ्या बघून... काय अडचण नाही मी काय करतो तुमच हे झालं ना तुम्ही केंव्हा फ्री हाय सांगा मी त्यातली थोडी अमाउंट देतो आणि हे क्लीयर करून घ्या... त्यांनतर मॅडम हं... असं बोलल्या त्यावर मी तीस हजार रूपये बोललो त्यावर मॅडम हं असं बोलल्या. त्यांनतर मी त्यांना मॅडम जरा सहकार्य करा परत असं बोललो त्यावर मॅडम ठिक आहे इकड करा

जाऊदे त्यानंतर मी त्यांना उदया असाल तिथे डीडी काढून देतो असं बोललो त्यावर उदया बाराच्या आत दया असे मॅडमनी सांगितले त्यानंतर मी ठिक आहे... असे बोलून पंचासह ए.सी.बी.कार्यालयात परत आलो असता नाळे साहेबांनी मला देषमुख मॅडम ची भेट झाली काय? तुमच्यात संभाशण झाल काय अषी विचारणा केली असता त्यांना मी वरील हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांनी समक्ष व्हाईस रेकॉर्डवरील संभाशण ऐकले असता देषमुख मॅडम यांनी माझ्याकडे एक लाख रूपयाची मागणी करून तडजोडीअंती सत्तर हजार रुपये लाच घेण्याचे मान्य करून पहिला हप्ता म्हणून तीस हजार रूपये लाच रक्कम घेवून दिनांक 26/04/2024 रोजी सकाळी येण्याबाबत सांगितले असल्याचे निश्पन्न झाल्यावरून दिनांक 25/04/2024 रोजीची सापळा कारवाई स्थगित केली.

त्यानंतर दिनांक 26/04/2024 रोजी माझी सकाळी मॅडमसोबत झालेल्या फोनवरील चर्चेनुसार आज 12.00 वा. धैर्यषील हा ॅलजवळ भेटण्याचे ठरल्यानुसार नाळे साहेब यांनी मला 11.00वाजता अँपल सरस्वती हा ॅस्पीटल,कदमवाडी परीसरात येण्यास सांगितल्याप्रमाणे तिथे पोहचलो असता तिथे नाळे साहेब व स्टाफ,दोन्ही पंच हजर होते. त्यानंतर श्रीमती देषमुख यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे अनुशंगाने सापळापुर्व कारवाई सुरू करीत असल्याचे नाळे साहेबांनी सांगून कारवाई सुरू केली व मला लाच रक्कम हजर करण्यास सांगितलेनुसार मला जोडणी झालेले तसे मी पंचवीस हजार रूपये रक्कम हजर केली. सदर लाच रक्कमेला स्टाफ मधील अंमलदार यांनी अ ॅंथ्रेसिन पावडर लावली व सदरची रक्कम माझ्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिषात ठेवून रेकॉर्डर सुरु करून ते माझेकडे दिले व त्यावेळी मी आणि पंच क्रमांक 01 असे माझ्या फॉर्रच्युनर गाडीने रवाना झालो. आमच्या पाठोपाठ सापळा पथक,पंच क्र.02 असे त्यांच्या खाजगी वाहनाने येवून बाटा षोरूम, धैर्यप्रसाद हॉल येथे सापळा लावून थांबले. तेवढयात मला देषमुख मॅडम यांचा व्हा ॅटसअ ॅप का ॅल आला आणि त्यांनी त्या धैर्यषील चैकात आल्याचे सांगून त्या चालवित असलेल्या टाटा नेक्सा ॅन गाडीमध्ये येवून बसण्यास सांगितले. त्यानुसार मी गाडीत जाऊन बसलो आणि मॅडमना मी सॅम्पल तपासणीचा अर्ज 5,750/- रूपयाचा डीडी दिला त्यावेळी मी त्यांना पंचवीस हजार रूपये लाच रक्कम देवू केली असता ती त्यांनी त्यांचे गाडीचे गेअर हॅन्डलजवळ ठेवण्यास सांगितले असता त्यांनी मला विचारले की, आपले सत्तर ठरलय ना... असे विचारले असता मी त्यांना सत्तर ठरलयं... त्यातील दहा दिले आहेत असे सांगितले त्यावर देषमुख मॅडम हुं... हुं.. असे म्हणाल्या आणि षिर्के सरांना दयायला लागतील ओ. त्यावर मी त्यांना आता काल सांगीतल की...त्यांना माहिती झालंय संगळ प्रकरण... माहिती आहे का बरोबर लगेच सोमवारी ढकलयं... त्यावर मी त्यांना परवा दहा दिले आणि हे पंचवीस पस्तीस आहेत,राहीलेल मॅडम भागवाले म्हणून कायतरी सहकार्य करा असे म्हणालो. त्यावर मॅडम बोलल्या की...म्हणुनच केल की मग...एक म्हटंल की... तुम्हाला रेटच एक हाय संगळा. त्यावर मी सत्तर हजार ठरलं होत त्यातले हे पंचवीस ते दहा... पस्तीस आहेत, मला सांगा बाकीचे मी नंतर देतो असे म्हणलो. त्यावर मॅडम दोन्ही एकदम दया संगळ... असे बोलल्या. त्यानंतर मी जागेवर नसतोय मॅडम असे बोललो असता त्या बोलल्या की मग... आजच सगळ दया... असे आमचे सर्व पैसे एकदमच देणेबाबत चर्चा होवून मॅडमनी विचारले की 5,900/- चा डीडी असताना आपण 5,750/- चा डीडी आणला आहे. त्यावर मी त्याना इकडचे तिकडचे जिल्हावाईज वेगळे असेल असे म्हणलो असता बहुतेक असावा तक्रार त्यांना माहीत झालीया... त्यावर मी त्यांना असूंदे आता त्यांना माहीत झाल त्यांना माहीती होवून काय आता...त्यांनी बोलेले असता त्याचवेळी तर मी तवा पण हे केल असत... षिर्के साहेबांच आता मला काय माहीतच नाही. मला त्यादिवषी फक्त त्यांनी विचारले काय विषेश तर मी काय नाही म्हणालो प्रतापदाकडे आलेलो इथ आहे समजंल म्हणून आलो असे बोललो. त्यावर देषमुख मॅडम बोलला नाही प्रतापनं सांगितल नाही का मग...षिर्के सरांना त्यावर मी त्यांना मी सॅम्पल तुम्हाला दिलेल बिलेल प्रतापनं काय बोललोच नाही ना...त्यावर मॅडम बोलल्या की,कोणाला बोलू पण नका. त्यावर मी षिर्के साहेबांना फक्त मॅडमनी सॅम्पल न्हेलय तर त्याच्यात काय होतय तर ते म्हणाले तुम्ही मॅडमषी भेटून काय ते बोलून घ्या. असे मी सांगत असताना मॅडम बोलल्या लईच वेळ झालाय त्यावर मी त्यांना हे पंचवीस व पुर्वीचे दहा एकुण पस्तीस झालेत बाकीचे तुम्ही सांगा तस पुर्तता करतो. त्यावर मॅडम म्हणाल्या बरं ठीक आहे ठेवा...तुम्ही एकदाच दिले तर बरं होईल...त्यावर मी एवढ करा संपवून टाका...असे बोललो असता मॅडमनी तुमच्या पोरांना पाठवून दयायच की असे बोलल्या... त्यावर मी सोमवारी पाठवून देतो त्याला हं... असे म्हणून मी गाडीतून उतरलो आणि त्यांनतर मी चश्मा काढून पैसे स्विकारलेनंतरचा पुर्वनियोजीत इषारा केला. इतक्यात देषमुख मॅडम आपली गाडी घेवून तात्काळ निघून जाऊ लागल्या असता लागलीच नाळे साहेब,पंच,सापळा पथक असे त्यांचा त्यांच्याकडील वाहनाने पाठलाग करून ताराबाई पार्क येथील विष्व रेसिडंन्सी या त्यांच्या इमारतीच्या पार्किंगमध्ये गाडी थांबविली असता नाळे साहेब व त्याच्या पथकाने त्यांना गाडीतच रंगेहाथ पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक चाचण्या केल्या त्यांनतर पुढील सर्व कारवाई ही लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालय,कोल्हापूर येथे करण्यात आली.

तरी श्रीमती किर्ती धनाजी देषमुख अन्न सुरक्षा अधिकारी अन्न व औशध प्रषासन विभाग, कोल्हापूर यांनी

माझेकडे माझे मे.सम्राट फुडस रेस्टा◌ॅरंटच्या जेवणाचे सॅम्पलबाबत कारवाई न करणेसाठी 1,00,000/-रू. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 70,000/- रुपये लाचेची मागणी करून पहिला हप्ता 30,000/-रु लाच रक्कमेची अप्रामाणिकपणे मागणी करून 25,000/- लाच रक्कम स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले आहे. तरी माझी श्रीमती किर्ती धनाजी देषमुख, वय.32 वर्षे, पद- अन्न-सुरक्षा अधिकारी, अन्न व औशध प्रषासन, कोल्हापूर रा. विष्व रेसिडन्सी, फ्लॅाट नं.202 ताराबाई पार्क,कोल्हापूर जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केलेली असून ती मी वाचुन पाहीली असता ती बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ajay janardan sindkar(I (Inspector)) / PNMAH46135 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

ठाणे अंमलदार
शाहुपुरी पोलीस ठाणे

**Name (**नाव**):** ajay janardan sindka

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** PNMAH46135